# सरदार वल्लभभाई पटेलांची संस्थानाच्या विलीनीकरणातील भूमिका

**प्रा. शरद वि. पाटील,** न्यू कॉलेज, कोल्हापूर, मो.नं. ८२७५९१८२६०, e-mail :- sharad६०९४@gmail.com
**प्रा. टी. एम. पाटील,** सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड , मो.क्र. ९४२३२७८११

प्रस्तावना: उत्तरेस साबरमती आणि दक्षिणेस माही या नद्यांमध्ये सध्या जमिनीचा सुपीक पट्टा आठवून येतो. हा पूर्वी जंगलाचा आणि दलदलीचा प्रदेश होता, असे सांगितले तर कोणाचा विश्वास बसणार नाही हे कर्तृत्व लेबा पाटीदार या जमिनीचे आहे. अकराव्या शतकात या जमिनीचे पूर्वज पंजाबमधील गुजरातमधून येथे वस्तीला आले. त्यांनी इथली जंगलं दूर केली. दलदल हटवली आणि हा प्रदेश सुपीक केला. या प्रदेशात मोडणारा खेडा जिल्हा सुपीक जमिन आणि दूध उत्पादनासाठी भारतभर प्रसिध्द आहे. हे लेबा पाटील प्रकृतीने कणखर आणि वृत्तीने बंडखोर होते. साहसप्रियता, साधेपणा, पुढाकार आणि दांडगं व्यवहारज्ञान या जन्मजात गुणांमुळे त्यांनी आपला ठसा व्यापार उदीमावर उठवला आहे. त्यांनी प्रशासकीय क्षेत्रातही नावकमावल आहे. काही तरी परदेशातही स्थानिक झाले आहोत. काही जण पार नर्मदेपर्यंत पोहोचले अशाच एका खेडा जिल्हयातील करमसद या खेडयात स्थानिक झालेल्या शेतकरी कुटूंबात वल्लभभाईचा जन्म हा ३१ ऑक्टोंबर १८७५ साली झाला. अशा एका महान युग पुरुषांचा सहवास भारतीय स्वातंत्र्याला लाभला. त्यांच्या सर्वांगुण संपन्न व्यक्तिमत्तवामुळे भारताच्या जडण घडणीत त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली. त्याच्या वेगवेगळया कामगिरीमुळेच आज जी भारताची प्रतिमा दिसते ती निर्माण झाली. त्याच्या कणखर बाण्यामुळे अखंड हिंदुस्थानीची निर्मिती झालीच तसेच त्यांच्या कर्तृत्वामुळे भारताला अखंडत्व प्राप्त झाले. अशा महान पुरुषाच्या विचारातून भारतात स्वांतत्र्याच्या वेळी निर्माण झालेला संस्थानाचा विलीनीकरणाचा मुद्दा संवेदनशील होता तो त्यांनी व्यवस्थित हाताळून अखंड भारताची निर्मिती केली. प्रस्तुत शोध निबंधात सरदार वल्लभभाई पटेलांची संस्थानाच्या विलीनीकरणातील त्याच्या भूमिकेचा विचार करणार आहोत.

१९४७ ला भारताला जे स्वातंत्र्य मिळाले ते फाळणीच्या रुपात मिळाले. या फाळणीचा परिणाम भारत पाकिस्तान भोगत होतेच याची परिणीती पुन्हा भारताच्या अंतर्गत प्रदेशात येऊ नये आणि पुन्हा भारताचे विभागणी होऊ नये म्हणून त्यांनी आपल्या कुशल नेतृत्वाच्या आधारावर संस्थानांच्या विलीनीकरणाचा मुद्दा नियोजनात्मकरित्या हाताळला तसेच जी परिस्थिती निर्माण झाली होती ती सुधारण्यामध्ये त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण होती.

संस्थानांच्या विलीनीकरणातील पटेलांची भूमिका :-

भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या अगोदर म्हणजे स्वातंत्र्याच्या संक्रमण कालावधीमध्ये पटेलांनी पीबी मेनन याच्या बरोबर राज्यांना अखंड भारतात सामिल होण्याचा प्रस्ताव दिला होता. त्यांनी या राज्यांना समजावलं की आपल्याला स्वायतत्ता दिली जाणार नाही. आपल्यला आपले राज्य भारतात विलीन करावे लागेल. यामध्ये फक्त काश्मीर, जुनागढ आणि हैदराबाद या राज्यांनी विरोध केला त्यांना आपली संस्थाने स्वातंत्र्य निर्माण करावयाची होती परंतु पटेलांच्या कणखर व्यक्तिमत्त्वामुळे जुना गढ आणि हैदराबाद भारतात विलीन झाले. परंतु काश्मीरचा प्रश्न निकालात निघाला नाही तो आज पर्यंत तसाच आहे. भारताच्या एकीकरणामध्ये पटेलांनी ५०० च्या वर संस्थानांचं अक्षरशः चुटकीसरशी भारतीय संघराज्यात विलीनकरण घडवून आणलं.

त्रिमंत्री मंडळानं सत्तांतर करण्याच्या योजनेमध्ये एक मेख मारुन ठेवली होती. ज्या दिवशी संस्थानांनी आपले हक्क साम्राज्याकडे सोपवले होते. ते त्यांना परत केले जातील. ब्रिटीश सम्राटाचे सार्वभौमत्त्व संपुष्टात येईल. याचा अर्थ सांख्यिकीय सार्वभौम होतील त्यांनी पूर्वी आपले हक्क ब्रिटीश सम्राटाच्या स्वाधीन केले तसे नवीन अत्वित्वात येणाऱ्या सरकारच्या स्वाधीन करावेत किंवा त्रिमंत्री मंडळाने अप्रत्यक्षरित्या संस्थानिकांचे सर्वभौमत्व राखून ठेवण्यास सहमती दिली होती त्यामुळे डिसेंबर १९४६ मध्ये संस्थानिक आपले गट बनवत आहेत, अशी शंका वल्लभभाईंना आली. लवकरच भोपाळचा नबाब आणि पॉलिटिकल डिपार्टमेंटचा कोनराड कॉरफील्ड हे संस्थानिकांचे गट बनवत आहेत असं त्यांच्या नजरेस आले. याच काळात वल्लभभाईंनी हंगामी सरकारमधील गृहखात्याचा ताबा घेतला. त्यावेळी पॉलिटिकल डिपाटमेंट चालवलेली कारस्थाने कर्मधर्म संयोगाने त्यांच्या ध्यानी आली आणि ही कारस्थानी त्यांनी उधळून लावली. तसेच त्यांनी संस्थानिकांना आपल्या संघराज्यात सामिल होण्याशिवाय आपल्याकडे पर्याय नाही असा निर्वाणिचा इशारा दिला त्यामुळे भारताचे एकीकरण करण्यामध्ये त्यांची भूमिका कशाप्रकारची होते हे स्पष्ट निदर्शनास येते.

पॉलिटिकल डिपार्टमेंटच्या कट कारस्थानांच एकच ध्येय होते की, भारताचे शक्य तितक्या प्रमाणात नुकसान करायचे या उद्देशाची जाणीव वल्लभभाईंना झाली त्याचवेळी त्यांना असे वाटले की आपला देश सुरिक्षित आणि बळकट बनवायचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे उरलेल्या भारताचं एकीकरण. या सर्व प्रसंगावरुन सरदार वल्लभभाई पटेल यांची संस्थानिकांच्या विलीनीकरणामध्ये किती महत्त्वाची भूमिका होती याचा कल्पना येते.

दि. २० फेब्रुवारीला त्यांनी एका मित्राला लिहीले, "जून, १९४८ नंतर भारतात राजेशाही असणार नाही आणि श्रेष्ठत्व हवेत विरुन जाईल." अशा प्रकारचे उद्‌गार काढून ते ब्रिटीशांना इशारा देऊ पाहत होते आणि त्यांच्या भारतामधील बेतावर कुरघोडी करत होते. भोपाळचा नबाब आणि कॉरफील्ड यांच्या हातातलं बाहुले बनणाऱ्या संस्थानिकांनाही हा इशारा होता. दुसऱ्या कोणत्याही भारतीय पुढाऱ्याजवळ हा धीटपणा आणि धैर्य नव्हतं. २६ मार्चच्या माऊंट बॅटन बरोबरच्या बैठकीत भोपाळचा नबाब काही संस्थानिकांना भारतात सामील न होण्यास उत्तेजन देत होता. देशी संस्थानिक ही एक तिसरी सत्ता बनविणाच्या त्याचा घाट होता व आपण त्याला पाठींबा देत होतो हे कॉरफील्डने कबुल केलं. त्यामुळे भारताचे एकीकरण होऊ नये यासाठी कोणकोणत्या शक्ती काम करत होत्या हे समजून येतं. यामध्ये वल्लभभाईंनी आपल्या कुशाग्र बुध्दीमत्तेच्या जोरावर या सर्व प्रकार उधळून लावत भारताच्या एकीकरण मजबुत केले. तसेच पॉलिटिकल डिपार्टमेंटच्या आणखी एक डाव वल्लभभाईंनी उधळून लावला. क्राऊन डिप्रेझेंटेटीव्ह पोलीस फोर्स संस्थानिकांना बहाल करायचा दूष्ट हेतू त्यांनी मनात धरला होता. तो प्रस्ताव त्या पोलिसांचे सेन्ट्रल रिझर्व्ह फोर्समध्ये रुपांतर करुन तर संभाव्य धोक्याच मूळ ठरलं असतं यामुळे संस्थानिक आपले वेगळे सैन्य ठेऊ शकले नाहीत. याचे श्रेय सरदार वल्लभभाई पटेलांना जाते. या सर्वात त्यांचा महत्त्वाचा उद्देश होता. संस्थानिकांना भारतात विलीन होण्यावाचून दुसरा कोणताच पर्याय शिल्लक ठेवायचा नव्हता.

माऊंट बॅटन यांनी ब्रिटनच्या राजाला भारत राष्ट्रकूलात राहील, असं मी पाहिन असं वचन दिलं होते. याला नुसती नेहरुंनी मुंडी हलवून भागणार नव्हते. वल्लभभाईच्या भरभक्कम पाठिंब्याशिवाय ते शक्य नव्हतं. वल्लभभाईना त्याची पूर्ण कल्पना होती. त्याचा त्यांनी पुरेपुर फायदा उठवला, भारतातील कोणतही संस्थानं वसाहत म्हणून राष्ट्रकुलाचे सभासद होऊ शकणार नाही अशा प्रकारचे वचन त्यांनी त्या बदल्यात मिळवले. आणखी एक गोष्ट त्यांनी केली, भारताच्या राष्ट्रकुलाच्या सभासदत्त्वाला संमती देताना त्यांनी एक अट घातली. "सार्वभौमत्त्वाला आता तिलांजली दिली जावी. तुम्ही त्याला प्रत्यक्ष अगर

अप्रत्यक्षरित्या जीवदान देता कामा नये. राजे आमचे आहेत. त्यांच्याशी कस वागायचं ते आम्ही ठरवू." यातून पटेलांनी राष्ट्रकुलाच्या सदस्य पदाच्या बदल्यात माऊंट बॅटन कडे आपली भूमिका स्पष्ट केली ही भूमिका संस्थानाच्या विलीनीकरणासाठी महत्त्वाची ठरली कारण अखंड भारताला राष्ट्रकूलाचे सभासद होता यावे. भारतातील इतर कोणत्याही संस्थानिकाला सभासद पद मिळणार नाही ही व्यवस्था पटेलांनी केली होती.

वल्लभभाई म्हणाले, "भारताच्या इतिहासातील एका अतिशय महत्त्वाच्या टप्प्यावर आपण येऊन पोहोचलो आहोत. सामुहिक प्रयत्नानं आपण आपल्या देशाला वैभवाच्या एका नवीन शिखरावर पोहोचवू शकू. आपल्यात जर एकी नसेल तर आपल्यापुढे नवीन संकटं उभी राहतील. मला आशा आहे, भारतीय संस्थानं हे लक्षात घेतली की सहकार्याला पर्याय बेबंदशाही आणि गोंधळ हा आहे. त्याच्या चपेटयात लहान थोर सारेच भरडले जाती. यांना संधी उपलब्ध झाली, पण ते तिचा परस्पर फायद्यासाठी उपयोग करण्यात निकामी ठरले, असा ठपका पुढील पिढयांनी आपल्यावर ठेवायची वेळ आपण आणावयास नको. यासाठी देशी संस्थानिक आपली संस्थाने बिनशर्त अखंड भारतात विलीन करतील जेणेकरुन भारताच्या पवित्र भूमीला जगातील राष्ट्रामध्ये योग्य स्थान मिळाले आणि शांततेच्या समृध्दीच्या वसतिस्थानामध्ये तिचं रुपांतर होईल."

भारताला स्वातंत्र्य देऊन ब्रिटीश पार्लेमेंट आपला हेतू साध्य केला होता. त्यांनी भारत आणि पाकिस्तान या दोन सार्वभौम राष्ट्राची निर्मिती केली होती या अनुषंगाने भारतातील संस्थानिकांना कोणत्या राष्ट्रात जायचं हा प्रश्न सर्वस्वी त्या संस्थानिकांचा राहणार होता. त्यामुळे अनेक संस्थानिक वेगळया सार्वभौम राष्ट्राच्या निर्मितीची स्वप्ने पाहत होती. संस्थानिकांना जाऊनच अधिकार दिले असते तर भारत पाकीस्तानाच्या बरोबर अनेक राष्ट्रे निर्माण झाली असती आणि आताचा एकसंध भारत राहीला नसता. आज जो एकसंध भारत आहे याच्या बाबतीत वल्लभ भाई पटेलांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे त्यांचे असे मत होते की, "आपण जर परिस्थिती नीट हाताळली नाही तर आपण कष्टाने मिळवलेले स्वातंत्र्य संस्थानिकांच्या फटीतून बाहेर पडेल."

प्रामुख्याने सरदार वल्लभभाई पटेलांची संस्थानिक विलीनीकरणातील भूमिका इतर कोणत्याही भारतीय नेत्यापेक्षा महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी आपल्या अधिकाराच्या माध्यमातून पॉलिटीकल डिपार्टमेंट, भोपाळचा नबाब पाकिस्तानचा हस्तक म्हणून काम करत होता. त्याला आपले संस्थान भारतात विलीन करावयास लावले त्यांनी आपल्या भूमिकेतून अखंड भारताची निर्मिती केली तसेच देशाला स्वातंत्र्य मिळवायच्या अगोदर संस्थानिकांचे विलीनीकरण चालू केले होते. एकंदरीत भारताच्या एकीकरण आणि संस्थानिकांच्या विलीनीकरणात सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्याच्या भूमिकेतूनच भोपाळ, हैद्राबाद यांच्यासह इतर संस्थानिकांना भारतात विलीनीकरणात त्यांची भूमिका अतुलनीय होती. आज जी अखंड भारताची प्रतिमा दिसते. त्यामध्ये सरदार वल्लभभाई पटेलांच्या इतकं दुसरे नेतृत्व भारताच्या एकीकरणाच्या प्रक्रियेत दिसत नाही. यावरुन असे म्हणता येईल की, भारताचे एकीकरणात वल्लभभाईंची भूमिका महत्त्वपूर्ण अशीच आहे.

संदर्भ -

१) वि. र. काळे - सरदार वल्लभभाई पटेल.

२) राजेंद्र मोहन भटनागर - सरदार